सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवासी वेल्फेअर असोसिएशन
नोंदणी क्र. महाराष्ट्र राज्य /मुंबई/१९६६/२०१२ जी.बी.बी.एस.डी.

दि. ७ ऑक्टोबर २०१२

प्रति,
मा. अनिलजी परब साहेब
विभाग प्रमुख
शिवसेना आमदार

**विषय : वि.नि.नि. ३३(५) संदर्भातील म्हाडा प्राधिकरणाच्या आडमूठ्या धोरणाविरोधात वसाहती मधील नागरिकांचे निवेदन.**

महोदय,

जय महाराष्ट्र!

सर्व प्रथम वसाहती मधील तमाम नागरीकांतर्फे म्हाडा विरोधात शिवसेनेसारख्या जनमानसात तळागाळा पर्यंत रूजलेल्या पक्षाने उभारलेल्या आंदोलनास जाहीर पाठींबा व्यक्त करून आंदोलन यशस्वी व्हावे ह्याकरीता अनेक शुभेच्छा.

सरदार वल्लभभाई पटेल नगर वसाहत म्हाडा प्राधिकरणाने जागतिक बँकेच्या माध्यामातून उभारून ३,५०० अल्प उत्पन गट (LIG) गाळे धारकांना ९८ सहकारी गृहनिर्माण संस्थामधून वसवली आहे. या वसाहती मध्ये प्राधान्याने मराठीजन बहुसंख्यने असून अंधेरी (प) येथील एक प्रमुख नागरी वसाहत मानली जाते.

राज्य शासनाच्या नगर विकास खात्याने म्हाडा प्राधिकरणास उपवब्ध करून दिलेल्या सुधारीत वि.नि.नि. ३३(५) अंतर्गत उपलब्ध २.५ चटई क्षेत्र योजनेच्या माध्यमातून वसाहती मध्ये सन २००७ मध्ये पुर्नविकासास प्रारंभ झाला. ह्या माध्यमातून वसाहतीमधील संस्थाना प्राधिकरणाने वि.नि.नि. ३३(५) मधील पर्याय २सी (ii) अंतर्गत अधिमूल्य स्विकारून १००% चटई क्षेत्र उपलब्ध करून ना हरकत प्रमाण पत्र देऊन त्या संस्था आज बांधकामच्या अवस्थेत आहेत. वसाहातील मधील २५चौ.मी., ३०चौ.मी. आणि ४०चौ.मी. सदनिका धारकांना आगामी काळात अनुक्रमे ५५०चौ.फु., ६५०चौ.फु., ८००चौ.फु. कारपेट आकारमानाच्या नविन सदनिका उपलब्ध होणार आहे. येथून हाकेच्या अंतरावर असणाऱ्या आराम नगर वसाहती मधील २५९चौ.फु. गाळे धारकास ११५०चौ.फु. आकारमानाची सदनिका उपरोक्त पर्याया नुसार उपलब्ध होणार आहे.

प्लॉट नं.७८/बी-१४, व.अं.साथी.स.गृ.सं.म. सरदार पटेल नगर (म्हाडा), वर्सोवा, अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३.

Scanned with CamScanner

सरदार वल्लभभाई पटेल नगर
रहिवासी वेल्फेअर असोसिएशन
नोंदणी क्र. महाराष्ट्र राज्य /मुंबई/१९६६/२०१२ जी.बी.बी.एस.डी.

एकिकडे पुर्नविसातून विभागातील काही गृहनिर्माण संस्थाना असा लाभ होत असताना. वसाहती मधील उर्वरीत संस्थाना दि. २० सप्टेंबर २०१० च्या म्हाडा सभेच्या ठरावाने हातबल झाला असून एका गटातील (LIG) संस्थाकरीता २ वेगवेगळे निकष लावण्याचे विचित्र दृष्य आपणास दिसत आहे. वास्तविक पाहता प्राधिकरणाने वि.नि.नि. ३३(५) अंतर्गत पुर्नविकासाचे दोन्ही पर्याय २सी (i)२सी (ii) संस्थाना उपलब्ध असल्याचे व पर्याय निवडीचे स्वातंत्र संस्थेस असल्याचे त्यांनी जून २००९ मध्ये प्रसिध्द केलेल्या मार्गदर्शन पत्रिकेस सष्ट केले आहेत. निर्सगीक लाभाले समानतेच्या निकषानिसार हे पर्याय निवडीचे स्वातंत्र सहकारी संस्थाना असने म्हाडास आवडत असताना प्रशासानाने काम करण्याचे काही आडमूठ्या अधिकाऱ्यामुळे प्राधिकरणाची सामान्य गाळेधाराकां प्रति असलेली लोककल्याणकारी भूमिकेस छेद देऊन "नफेखोर विकासक" अशी म्हाडाची प्रतिमा जनमाणसात तयार होत आहे. तसा प्रयत्न केला जात आहे पण परिणाम मात्र सामान्य गाळेधारकास सहन करावा लागत आहे.

सदर निवेदनाच्या माध्यामातून आम्हास अधिमूल्य स्विकारून १००% चटईक्षेत्र उपलब्ध झालेच पाहिजे हि वसाहतीमधील तमाम नागरीकांची, गाळेधारकांची, आग्रही मागणी, आपणाकडे आग्रहाने माडत असून सरकार दरबारी आपणतिचा पाठपुरवा करावा अशी नम्र विनंती. आज पर्यंत दुर्लक्षित असलेल्या म्हाडा गाळेधारकांच्या समस्येस वाचा फोडून त्याच्या आदरास प्राप्त झाले आहात हि अभिनंदनीय बाब आहे.

आपल्या ह्या आंदोलनात आपला सक्रीय सहभाग देऊन हा लढा असा यशस्वी निर्णय प्राप्त होवो हि आई जगदंबे चरणी प्रार्थना.

कळावे,

आपला विश्वासू,

सरदार वल्लभभाई पटेल नगर रहिवासी वेलफेअर असोसिएशन
(अध्यक्ष) (सचिव) (खजिनदार)

प्लॉट नं.७८/बी-१४, व.अं.साथी.स.गृ.सं.म. सरदार पटेल नगर (म्हाडा), वर्सोवा, अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३.

Scanned with CamScanner

सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवासी वेल्फेअर असोसिएशन
नोंदणी क्र. महाराष्ट्र राज्य /मुंबई/१९६६/२०१२ जी.बी.बी.एस.डी.

दि. ७ ऑक्टोबर २०१२

प्रति,

मा. सुभाषजी देसाई साहेब
शिवसेना नेते,
शिवसेना आमदार

**विषय : वि.नि.नि. ३३(५) संदर्भातील म्हाडा प्राधिकरणाच्या आडमूठ्या धोरणाविरोधात वसाहती मधील नागरिकांचे निवेदन.**

महोदय,

जय महाराष्ट्र!

सर्व प्रथम वसाहती मधील तमाम नागरीकांतर्फे म्हाडा विरोधात शिवसेनेसारख्या जनमानसात तळागाळा पर्यंत रूजलेल्या पक्षाने उभारलेल्या आंदोलनास जाहीर पाठींबा व्यक्त करून आंदोलन यशस्वी व्हावे ह्याकरीता अनेक शुभेच्छा.

सरदार वल्लभभाई पटेल नगर वसाहत म्हाडा प्राधिकरणाने जागतिक बँकेच्या माध्यामातून उभारून ३,५०० अल्प उत्पन गट (LIG) गाळे धारकांना ९८ सहकारी गृहनिर्माण संस्थामधून वसवली आहे. या वसाहती मध्ये प्राधान्याने मराठीजन बहुसंख्येने असून अंधेरी (प) येथील एक प्रमुख नागरी वसाहत मानली जाते.

राज्य शासनाच्या नगर विकास खात्याने म्हाडा प्राधिकरणास उपलब्ध करून दिलेल्या सुधारीत वि.नि.नि. ३३(५) अंतर्गत उपलब्ध २.५ चटई क्षेत्र योजनेच्या माध्यमातून वसाहती मध्ये सन २००७ मध्ये पुर्नविकासास प्रारंभ झाला. ह्या माध्यमातून वसाहतीमधील ८ संस्थाना प्राधिकरणाने वि.नि.नि. ३३(५) मधील पर्याय २सी (ii) अंतर्गत अधिमूल्य स्विकारून १००% चटई क्षेत्र उपलब्ध करून ना हरकत प्रमाण पत्र देऊन त्या संस्था आज बांधकामच्या अवस्थेत आहेत. वसाहती मधील २५चौ.मी., ३०चौ.मी. आणि ४०चौ.मी. सदनिका धारकांना आगामी काळात अनुक्रमे ५५०चौ.फु., ६५०चौ.फु., ८००चौ.फु. कारपेट आकारमानाच्या नविन सदनिका उपलब्ध होणार आहे. येथून हाकेच्या अंतरावर असणाऱ्या आराम नगर वसाहती मधील २५९चौ.फु. गाळे धारकास ११५०चौ.फु. आकारमानाची सदनिका उपरोक्त पर्याया नुसार उपलब्ध होणार आहे.

प्लॉट नं.७८/बी-१४, स.अं.साथी.स.गृ.सं.म. सरदार पटेल नगर (म्हाडा), वर्सोवा, अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३.

Scanned with CamScanner

एकिकडे पुर्नविकासातून विभागातील काही गृहनिर्माण संस्थाना असा लाभ होत असताना. वसाहती मधील उर्वरीत संस्थाना दि. २० सप्टेंबर २०१० च्या म्हाडा सभेच्या ठरावाने हातबल झाला असून एका गटातील (थ्ड) संस्थाकरीता २ वेगवेगळे निकष लावण्याचे विचित्र दृष्य आपणास दिसत आहे. वास्तविक पाहता प्राधिकरणाने वि.नि.नि. ३३(५) अंतर्गत पुर्नविकासाचे दोन्ही पर्याय २सी (ग)२सी (ग) संस्थाना उपलब्ध असल्याचे व पर्याय निवडीचे स्वातंत्र संस्थेस असल्याचे जून २००९ मध्ये प्रसिध्द केलेल्या मार्गदर्शन पत्रिकेत सष्ट केले आहेत. निर्सगीक न्यायाने समानतेच्या निकषानूसार हे पर्याय निवडीचे स्वातंत्र सहकारी संस्थाना असने म्हाडास मान्य असताना प्रशासानात काम करण्ऱ्या काही आडमूठ्या अधिकाऱ्यामुळे प्राधिकरणाची सामान्य गाळेधाराकांप्रति असलेली लोककल्याणकारी भूमिकेस छेद देऊन "नफेखोर विकासकह अशी म्हाडाची प्रतिमा जनमानसात तयार होत आहे. तसा प्रयत्न केला जात आहे पण परिणाम मात्र सामान्य गाळेधारकास सहन करावा लागत आहे.

सदर निवेदनाच्या माध्यामातून आम्हास अधिमूल्य स्विकारून १००% चटईक्षेत्र उपलब्ध झालेच पाहिजे हि वसाहतीमधील तमाम नागरीकांची, गाळेधारकांची, आग्रही मागणी, आपणाकडे आग्रहाने माडत असून सरकार दरबारी आपणतिचा पाठपुरवा करावा अशी नम्र विनंती. आज पर्यंत दुर्लक्षित असलेल्या म्हाडा गाळेधारकांच्या समस्येस वाचा फोडून त्याच्या आदरास प्राप्त झाले आहात हि अभिनंदनीय बाब आहे.

आपल्या ह्या आंदोलनात आपला सक्रीय सहभाग देऊन, हा लढा असा यशस्वी निर्णय प्राप्त येवो हि आई जगदंबे चरणी प्रार्थना.

कळावे,

आपला विश्वासू,
सरदार वल्लभभाई पटेल नगर रहिवासी वेलफेअर असोसिएशन

(vidit bhuwa Hon.) 8/10/12

(अध्यक्ष) (सचिव) (खजिनदार)



Scanned with CamScanner

# सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवासी वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्र. महाराष्ट्र राज्य / मुंबई / १११६ / २०१२ जी.बी.बी.एस.डी.


दि. ११.०७.२०१३

MUMBAI DISTRICT CO-OPERATIVE HOUSING FEDERATION LTD.

मा. अध्यक्ष / सचिव
मुंबई डिस्ट्रीक्ट को-ऑप. हाऊसिंग फेडरेशन,
१९, वेल इमारत, सर पी. एम. रोड,
फोर्ट, मुंबई - १

**विषय - हाऊसिंग फेडरेशनतर्फे मा. अध्यक्षांचे उप संचालक, नगर रचना मुंबई महानगरपालिका यांना विनिमय ३३(५) संदर्भात दि. २९ जून २०१३ रोजी पाठविलेले पत्रासंदर्भात निवेदन.**

महोदय,

आमची उपरोक्त संस्था सरदार वल्लभभाई पटेल नगर वसाहत, ४ बंगला, अंधेरी (प.) येथे कार्यरत असून वसाहतीमधील ३०३३ सदनिकाधारकांचे प्रतिनिधीत्व करते. आमची वसाहत ही ९८ गृहनिर्माण संस्थांची LIG प्रवर्गाची वसाहत आहे.

शासनाने विनिमय ३३ (५) मधील प्रस्तावित सुधारणांचा मसूदा (Notification) दि. ४ मे २०१३ रोजी प्रसिध्द करुन हरकती मागविल्या होत्या त्या अनुषंगाने आपण दि. २९ जून २०१३ रोजी नोंदविलेली हरकत 'हाऊसिंग टाईम्स' वाचनात आली. सदरहू हरकतीमध्ये आपण प्रामुख्याने अभिहस्तांतरण झालेल्या संस्थांच्या संदर्भात उहापोह केला आहे.

*वास्तवात आपणांस माहितच असेल की, अभिहस्तांतरण पूर्ण झालेल्या म्हाडा गृहनिर्माण संस्थांची संख्या हातावर मोजण्याइतकी आहे. तसेच हया गृहनिर्माण संस्थांमध्ये बैठया चाळीत राहणा-या सदनिका धारकांचे प्रमाण सर्वात जास्त आहे. आपण हरकतीमध्ये नमूद केल्याप्रमाणे, ''अभिहस्तांतरण किंवा हस्तांतरण केले गेले नसेल तर नविन ३३ (५) नियम अमलात आणू शकता येईल'' हया मागणीनूसार उपरोक्त मसूदा (Notification) जसाच्या तसा लागू केल्यास सदनिकाधारकांचे अपरिमीत नूकसान होणार आहे.*

परिणामी असोसिएशनने नोंदविलेल्या हरकतीची प्रत आपणांस देत आहोत. तसेच म्हाडा वसाहतींमध्ये नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थांमधील सदनिकाधारकांकरीता आपल्या महासंघाने शासनासमवेत संवाद साधावा ही विनंती.

कळावे,

आपले विश्वासू
सरदार वल्लभभाई पटेल नगर रहिवासी वेलफेअर असोसिएशन

श्री. आनंद प्रकाश जाधव
(अध्यक्ष)

महाराष्ट्र राज्य, मुंबई १११६ २०१२ जी.बी.बी. एस.डी.

MUMBAI DISTRICT CO-OPERATIVE HOUSING FEDERATION LTD.


संकेतस्थळ - www.svpnrwa.in

प्लॉट नं.७८/बी-१४, स.अं.साथी.स.गृ.सं.म. सरदार पटेल नगर (म्हाडा), वर्सोवा, अंधेरी (प), मुंबई ४०००५३.


Scanned with CamScanner

O/C (8)

# सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवासी वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्र. महाराष्ट्र राज्य /मुंबई/१९६६/२०१२ जी.बी.बी.एस.डी.

दिनांक: १३/०७/२०१३

प्रति
मा. रमेशजी प्रभू,
अध्यक्ष, महाराष्ट्र सोसायटी वेलफेअर असोसिएशन
यांसी,

सविनय नमस्कार!

महोदय,

उपरोक्त संघटना ही सरदार वल्लभभाई पटेल नगर ह्या म्हाडा वसाहतीमधील ३०३३ सदनिकाधारकांची उभारलेली लोकचळवळ असून ह्या संघटनेच्या माध्यमातून नगरातील तमाम पायाभूत आणि मूलभूत प्रश्नांची उकल करण्याचा सातत्याने प्रयत्न केला जात असतो.

सरदार वल्लभभाई पटेल नगर हि वसाहत म्हाडा प्राधिकाणाने जागतीक बँकेच्या अर्थसहाय्याने उभारलेली असून १८ संस्थामधून ३०३३ सदनिकाधारक येथे वास्तव्य करीत आहेत. सदरहू वसाहत म्हाडा प्राधिकाणाच्या LIG प्रवर्गात येते. वसाहतीमध्ये २००७ पासून पूर्नविकासाचे वारे वाहू लागले. आणि येथील अनेक संघटनांनी पुर्नविकासाच्या ह्या लोकपयोगी संकल्पनेचा निव्वळ आपल्या स्वार्थाकरिता उपयोग चालविल्याने वसाहतीमधील प्रामाणिक सूज्ञ मंडळींनी एकत्रीत येऊन सरदार वल्लभभाई पटेल नगर रहिवासी वेलफेअर असोसिनची निर्मिती केली. निर्मिती पासूनच असोसिएशनने पूर्नविकासाच्या प्रश्नास वाचा फोडण्याकरीता मा. मूख्यमंत्र्यांपासून सर्व संबंधीत अधिकारी, व्यक्तीं यांससमवेत बैठका, पत्राचार करण्यास सुरुवात केली आहे.

म्हाडा प्राधिकरणाने विनिमय ३३(५) संदर्भात दि. ४ मे २०१३ रोजी जारी केलेल्या मसूदयावर (Notification) लेखी हरकत मा.उप. संचालक नगर रचना बृहन्मुंबई महानगरपालिका, ह्यांजकडे असोसिएशनने नोंदविली असून त्याची प्रत ह्या निवेदनासमवेत देत आहोत.

आपणही आपल्या संघटनेच्या माध्यमातून सहकारी संस्थेंचे प्रश्न सोडविण्याकरीता सतत प्रयत्नशील असता. म्हाडा प्राधिकरणाच्या वसाहतीमधून २ लाख्यांच्या आसपास रहात असणाऱ्या सदनिकाधारकांकरीता पूर्नविकास हा पर्याय अतीशय महत्वाचा असून त्या अनूषंगाने नविन विकास नियमावली मसूदा पारित करण्याकरिता शासनाचे सूतोवाच केले असून आपणही सदनिकाधारकांच्या वतीने शासना समवेत संवाद साधावा हि विनंती. जेणेकरुन सदनिकाधारकांच्या मागण्या शासनाकडे मांडण्यास सहकार्य होईल.

कळावे,

आपले विश्वासू

सरदार वल्लभभाई पटेल नगर रहीवासी वेल्फेअर असोसिएशन

MAHARASHTRA SOCIETIES WELFARE ASSOCIATES

| श्री. आनंद जाधव | श्री. सुर्यकांत ननावरे | श्री. अनिल परदेशी |
|---|---|---|
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |
| (९९६७०९४०९४) | (९८२१७२७९९४) | (९८३३०९२४१८) |

13.07.13

प्लॉट नं.७८/ बी-१४, ब.अं.साथी.स.गृ.सं.म. सरदार पटेल नगर (म्हाडा), वर्सोवा, अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३.

www.svpnrwa.in

Scanned with CamScanner